**शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१**
**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी-11thonlineadmissiondydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिद्धी निवेदन

## दिनांक :०३/०७/२०१७ .

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११वी सन २०१७-१८ ची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. या प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश अर्ज भाग-१ व भाग-२ पूर्ण करण्याची अंतिम मुदत दि.२९ जून २०१७ सायं.०४:०० वा. देण्यात आलेली होती, त्यानुसार विद्यार्थ्यांनी भाग-१ व भाग-२ पुर्ण केलेले आहेत.

या वेळापत्रकानुसार दि. ०४ जुलै २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती तपासण्यासाठी जनरल मेरिट लिस्ट जाहीर होणार आहे. या यादीतील माहितीनुसार **दिनांक ०४ व ०५ जुलै २०१७** रोजी विद्यार्थ्यांच्या अर्जात काही त्रुटी असल्यास **(उदा-आरक्षणाबाबत बदल, नावांत बदल, जन्म तारखेत बदल, मार्क्स मध्ये बदल इ.)** वेबसाईट वरील हॉम पेजवर नोटीफीकेशनमध्ये उपलब्ध असलेला हरकती / त्रुटीचा अर्ज डाऊनलोड करून प्रिंट घेऊन माहिती भरून विद्यार्थ्यांनी वरील दिनांका दिवशी सकाळी ११ ते ४.०० या वेळेत जवळच्या मार्गदर्शन केंद्रावर त्रुटी /हरकती बाबत पुराव्यासह करावयाच्या दुरुस्तीसह अर्ज मार्गदर्शन केंद्रावर जमा करावा.

**सदर त्रुटी पाहाण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.**

१) विद्यार्थ्यांने इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune. 11thadmission.net या संकेतस्थळावर जावून तेथे उपलब्ध असलेल्या नोटीफीकेशन ( Notification) मध्ये दिलेल्या लिंक वर ( Click) करुन यादी डाऊन लोड ( Download) करुन घ्यावी. व Control (F) दाबून फॉर्म नंबर टाकून माहिती पाहावी.

२) विद्यार्थ्यांने आपली माहिती तपासून बरोबर असल्याची खात्री करावी . माहिती बरोबर नसल्यास सदर माहिती दुरुस्ती करावयाची असल्यास जवळच्या मार्गदर्शन केंद्रावर जावुन हरकती च्या अर्जाची प्रत घेवून हरकती अर्ज व्यवस्थीत वाचन करुन, अर्ज भरुन करावयाच्या दुरुस्तीच्या पुराव्यासह मार्गदर्शन केंद्रावर जमा करावी.

३) तसेच विद्यार्थ्यांने ( Student Login ) मध्ये जावून विद्यार्थी ( My Status) मध्ये जावुन आपला ( Form No) टाकून ( Grid) मध्ये आपली माहिती पाहु शकतील.

४) विद्यार्थ्याने/पालकाने आपला हरकती अर्ज दिलेल्या दिनांकादिवशी व वेळेत मार्गदर्शन केंद्रावर जमा करावा वेळेनंतर आलेल्या हरकती अर्जाच विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(विशेष सूचना :- एटीकेटी (ATKT) व तसेच जुलै २०१७ पुर्नपरीक्षेत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांसाठी निकालानंतर प्रवेश प्रक्रियेच्या फे-यांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल).

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
सदस्य सचिव
इ . 11 वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश नियंत्रण समिती,
पुणे
तथा
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे